# सदस्य, औद्योगिक न्यायालय, सोलापूर यांचे न्यायालयात

## तक्रार (अ.का.प्र.) क्र.८७/२०२०.

(CNR NO. MHIC130001182020)

श्री राजेंद्र नरहरी शिंदे ... तक्रारदार.

**विरूध्द**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सोलापूर. ... सामनेवाले.

---

## : निशाणी क्र.सी—१० खाली आदेश :

(दिनांक:—१०/०७/२०२५)

१. सदरकामी सामनेवाले यांनी दिलेला अर्ज व त्यावरील तक्रारदारांचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

२. सामनेवाले यांनी सदर अर्जाव्दारे उलटतपास काहीही नाही झालेला दि. २१/०२/२०२५ रोजीचा आदेश रदद होवून सामनेवाले यांना उलटतपास घेण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे.

३. युक्तिवादा दरम्यान सामनेवाले यांचेतर्फे श्री होसमनी एस डी विधिज्ञ यांनी असे युक्तिवाद केला की, सदरची केस आजरोजी तक्रारदार यांच्या उलटतपासाकरिता असून सदर केसमध्ये सामनेवाले हे शासकीय कामकाजानिमित्त परगावी असल्यामुळे तसेच वेळोवेळी शासकीय मिटिंग असल्यामुळे त्यांच्या विधिज्ञांना वेळेत भेटून अथवा मे.न्यायालयात हजर राहू शकलेले नाहीत. त्यामुळे या न्यायालयाने सामनेवाले यांचेविरुध्द उलटतपास काही नाही व सामनेवाले यांना तोंडी पुरावा करण्याचा नाही असा आदेश दि. २१/०२/२०२५ रोजी पारीत केला आहे.

४. श्री होसमनी विधिज्ञ यांनी शेवटी असा युक्तिवाद केला की, आजरोजी सामनेवाले या न्यायालयात हजर आहेत त्यामुळे त्यांच्याविरुध्द झालेला पुरावा नाही व उलटतपासणी काहीही नाही झालेला आदेश रदद होवून तक्रारदार हिचे उलटतपास

घेणे परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व जरुरीचे होईल म्हणून सामनेवाले यांचा अर्ज मंजूर करण्यात यावा आणि तक्रारदार हिचे उलटतपासणी घेण्यास परवानगी देण्यात यावी तसे केल्याने सदरचे प्रकरण गुणदोषावर निकाली निघणार आहे. परंतू सामनेवाले यांचा अर्ज मंजूर न झाल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे असे आतोनात नुकसान होणार आहे म्हणून सामनेवाले यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

५. याउलट तक्रारदारातर्फे श्री व्ही आर देशपांडे विधिज्ञ यांनी सामनेवाले यांच्या अर्जास जोरदार हरकत घेतली. त्यांनी पुढे युक्तिवाद केला की, तक्रारदार कर्मचारी हे ग्रामीण भागातील रहिवाशी आहेत वारंवार तारखांना येवून जाणे त्यांना आर्थिक दृष्टया परवडणारे नाही सामनेवाले यांनी केवळ वेळकाढूपणाचे धोरण अवलंबले आहेत त्यामुळे अर्जात कोणतेही तथ्य नसल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावी अशी विनंती केली.

६. दोन्ही विधिज्ञांचा तोंडी युक्तिवाद ऐकल्यानंतर मी संचिकेची पूर्ण पाहणी केली मला असे आढळले की, तक्रारदार महाराष्ट्र कामगार संघाना मान्यता देणेबाबत आणि अनुचित कामगार प्रथा प्रतिबंध करणेबाबत कायदा १९७१ कलम २८ अनुसूची ४ बाब क्र.५, ९ आणि १० अन्वये सामनेवाले यांनी अनुचित कामगार प्रथा अवलंबविल्याचे घोषित करुन मागितले आहे. तसे तक्रारदारांना दि.१५/०७/२०१७ ते दि.११/०५/२०१८ या कालावधीत संपूर्ण पगार, वार्षिक वेतनवाढ, सलगसेवा, उपदानाची रक्कम, भविष्य निर्वाह निधीची रक्कम, पेन्शन व इतर सेवानिवृत्तीचे लाभ १२ टक्के व्याजासह देण्याचे मागणी केली आहे. मला असेही आढळले की, दोन्ही पक्षकारांचे जबाब पूर्ण झाल्यानंतर माझे पूर्वाधिकारी यांनी नि.क्र.ओ.३ खाली वादमुददे निश्चित केले आहेत. त्यानंतर असे दिसून येते की, तक्रारदार हे मयत झाले आणि त्यांच्या वारसांनी नि.क्र.यू.६ खाली अर्ज देवून वारस

रेकॉर्डवरती आणण्यात आले आहे. त्यानंतर तक्रारदारातर्फे श्रीमती संगिता राजेंद्र शिंदे यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.यूडब्ल्यू.१ खाली दि.२९/०७/२०२४ रोजी दाखल केले आहे. परंतू सामनेवाले यांना वारंवार संधी देवून देखील ते उलटतपास घेतला नाही म्हणून माझे पूर्वाधिकाराने दि.२१/०२/२०२५ रोजी उलटतपास काहीही नाही असा आदेश केला आहे. त्यानंतर तक्रारदारातर्फे नि.क्र.यू.१० खाली पुरावा बंद केल्याची पुरसिस दाखल केली आहे. संचिकेत असे दिसून येते की, सामनेवाले यांना त्यांचा तोंडी पुरावा करण्याकरिता संधी देवून देखील त्यांनी पुरावा नोंदविला नाही म्हणून पुर्वाधिका—यांनी दि.०८/०५/२०२५ रोजी सामनेवाले यांचा पुरावा बंद केला आहे.

७. सामनेवाले यांनी त्यानंतर नि.क्र.सी.६ खाली सदरचा अर्ज देवून उलटतपास काहीही नाही व सामनेवाले यांचा पुरावा बंदचा आदेश रददबातल करुन सामनेवाले यांना तक्रारदारांचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली आहे. सामनेवाले यांनी नि.क्र.सी.७ खाली कैफीयत दाखल करुन बरेच मुददे उपस्थित केले आहे. शिवाय युक्तिवादा दरम्यान सामनेवाले यांचे विधिज्ञ इथून पुढे तारखा न मागता कामकाज गतीने चालविण्याचे हमी दिली याचा विचारत करता सदरचे प्रकरण सन २०२० पासून प्रलंबित आहे आणि तक्रारदारांची मागणी सेवानिवृत्तीचे लाभ मागणीकरिता दाखल असल्याने न्यायाच्या दृष्टीने सामनेवाले यांना त्यांची बाजू मांडण्याची पूर्ण संधी देणे आवश्यक आहे मात्र लोटलेला कालावधीचा विचार करता काही प्रमाणात दंड (कॉस्ट) लावून उलटतपास नाही असा झालेला आदेश दि. २१/०२/२०२५ रदद केल्यास दोन्ही पक्षकारांचे कसल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही त्यामुळे प्रकरण गुणदोषावर निकाली निघेल. न्यायाच्या दृष्टिकोनातून मला सामनेवालातर्फे श्री होसमनी विधिज्ञ यांच्या युक्तिवादात तथ्य आढळले म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे.

८. वरील विवेचनावरुन सदरचा अर्ज मंजूर करुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.क्र.सी.१० मंजूर करण्यात येत आहे. त्याकरिता सामनेवाले यांनी रु.१०००/— दंड या न्यायालयात पुढील तारीख किंवा त्यापूर्वी जमा करावी.

२. सामनेवाले सदरची कॉस्टची रक्कम भरले नाही तर सदरचा नामंजूर झाला असे समजण्यात यावे.

३. आदेशाच्या पूर्ततेसाठी पुढील तारीख दिली.

MURGYAPPA RAMANNA KUMBHAR

Digitally signed by MURGYAPPA RAMANNA KUMBHAR
Date: 2025.08.08 16:44:44 +0530

दिनांक:—१०/०७/२०२५. (मु.रा.कुंभार)

***माकम/—*** सदस्य,

औद्योगिक न्यायालय, सोलापूर.